महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार





छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २५७ वे दिनांक : १३/०९/२०२६ वार : रविवार

## 'माझा भाऊ शांततेतच करेल!'; अमृता फडणवीसांची जरांगेंवर प्रतिक्रिया



**अहिल्यानगर :** मराठा आरक्षणाच्या मागणीवरून मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा तापण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी जरांगे पाटील यांच्याबाबत महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. "सणासुदीचे दिवस लक्षात घेऊन माझा भाऊ जे करायचे ते शांततापूर्वकच करेल, असा मला विश्वास आहे," असे अमृता फडणवीस यांनी म्हटले आहे. काही दिवसांपूर्वीच अमृता फडणवीस यांनी मनोज जरांगे पाटील यांना 'भाऊ' संबोधत आपल्या घरी जेवणाचे निमंत्रण दिले होते. त्यावर जरांगे यांनीही सकारात्मक प्रतिक्रिया देत भाऊबीजेच्या दिवशी त्यांच्या घरी जेवायला जाण्याचे सांगितले होते. आता जरांगे मुंबईत आंदोलनासाठी येण्याच्या तयारीत असल्याच्या पार्श्वभूमीवर अमृता फडणवीस यांनी पुन्हा त्यांना 'भाऊ' म्हणत शांततेचे आवाहन केले आहे. पत्रकारांनी अमृता फडणवीस यांना मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाबाबत प्रश्न विचारला. गणेशोत्सवाचे दिवस सुरू असताना जरांगे मुंबईत आंदोलनासाठी येणार असतील, तर आपण त्यांना काय सल्ला द्याल, असा सवाल त्यांना करण्यात आला. यावर अमृता फडणवीस म्हणाल्या की, "माझा भाऊ सणासुदीचे दिवस आहेत हे लक्षात घेऊन जे करायचे ते शांततापूर्वकच करेल, असा मला विश्वास आहे." जरांगे पाटील यांनी मुंबईत येऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अशा परिस्थितीत सणांच्या काळात कायदा-सुव्यवस्था आणि सामान्य नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी आंदोलन शांततेत व्हावे, अशी अपेक्षा अमृता फडणवीस यांच्या वक्तव्यातून व्यक्त झाली. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबाबत बोलताना अमृता फडणवीस यांनी आरक्षणाचा मुद्दा अत्यंत संवेदनशील असल्याचेही म्हटले. त्यांच्या मते, या प्रश्नावर सरकारने तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. "हा विषय खूप संवेदनशील आहे. आरक्षणाचा प्रश्न आहे. राज्य सरकार पूर्णपणे त्याच्या मागे आहे. यावर काहीतरी तोडगा निघू शकतो. मी वेगळी गोष्ट बोलण्यापेक्षा सरकारने आणि संबंधितांनी मिळून येणाऱ्या दिवसांत यावर समाधानकारक मार्ग शोधावा, अशी अपेक्षा आहे," असा आशय त्यांच्या प्रतिक्रियेतून समोर आला. त्यामुळे एका बाजूला जरांगे यांच्या आंदोलनाची तयारी सुरू असताना दुसऱ्या बाजूला सरकार आणि आंदोलक यांच्यात संवादातून मार्ग काढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## 'फक्त पुण्यातील लोकच गैरवर्तन करतात का?'; कोर्टाचा सवाल



**मुंबई :** मुंबई हायकोर्टाने शुक्रवारी 10 दिवसांच्या गणेशोत्सवादरम्यान दारूबंदी लागू केल्याबद्दल पुणे प्रशासनावर जोरदार टीका केली. मुंबई व इतर भागांवर असे निर्बंध नसताना केवळ पुणे जिल्ह्यालाच का लक्ष्य केले जातेय. फक्त पुण्यातील लोकच दारू पिल्यावर गैरवर्तन करतात का, असा सवालही हायकोर्टाने केला. मुख्य न्यायमूर्ती एम. सी. त्रिपाठी व न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने प्रशासनाला ही बंदी मागे घ्या किंवा न्यायालयीन कारवाईला सामोरे जा असा इशारा दिला. एकाच जिल्ह्यात अशी मनमानी करून प्रशासन पुणे व तेथील रहिवाशांना कलंकित करत आहे, असेही कोर्टाने नमूद केले. दरम्यान, न्यायालयाने फटकारल्यानंतर पुणे जिल्हा प्रशासनाने दहा दिवस दारू बंदीचा आदेश मागे घेतला. आता फक्त 14, 25 सप्टेंबरला ड्राय डे राहील.

... तर मद्यपी रुग्णालयांत गर्दी करतील : हायकोर्ट


परवानाधारकांना 10 दिवसांसाठी त्यांचा व्यवसाय करण्यावर सरसकट बंदी घालणारा आदेश पारित केला जाऊ शकत नाही. अशा बंदीमुळे व्यसनी दारू पिणाऱ्यांना वैद्यकीय समस्यांना सामोरे जावे लागेल. जर त्यांना 10 दिवस प्यायला मिळालं नाही, तर ते रुग्णालयांमध्ये गर्दी करतील,' असे मुख्य न्यायमूर्ती त्रिपाठी उपहासाने म्हणाले.

## 'तटकरे कंपन्यांना ब्लॅकमेल करतात'; दळवींचा खळबळजनक आरोप



**रायगड :** राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते सुनील तटकरे कंपन्यांना ब्लॅकमेल करत असल्याचा खळबळजनक आरोप शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केला आहे. गेल्या काही दिवसांपासून शिंदे गट आणि अजित पवार गटात अंतर्गत वाद समोर येत आहेत. त्यातच आता थोरवे यांनी केलेल्या आरोपामुळे त्यात भर पडल्याचे दिसत आहे. यामुळे एकूणच महायुतीमध्ये सगळे काही आलबेल नसल्याचे बोलले जात आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या आंदोलनावरून शिंदे गट आणि अजित पवार गटात जुंपली आहे. आमदार महेंद्र थोरवे यांनी सुनील तटकरे यांच्यावर आरोप करत पुन्हा एकदा निशाणा साधला आहे. आंदोलनकर्त्यांनी स्वतःची झोळी भरण्यासंस्थि केलेली स्टंटबाजी होती. हा प्रकार सगळ्यांच्या लवकरच लक्षात येईल, असे थोरवे यांनी म्हटले आहे. तसेच खालापूर येथील कंपन्यांना राष्ट्रवादी त्रास देण्याचे काम करत असल्याचा आरोपही थोरवे यांनी केला आहे. स्थानिकांना रोजगार देण्याचे काम कंपन्या करतात. मात्र अशा कंपन्या कोणी बंद पाडण्याचा विचार करत असेल तर त्याला जशास तसे उत्तर दिले जाईल. असा इशारा थोरवे यांनी दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून रायगडच्या पालकमंत्रीपदावरून मंत्री भरत गोगावले आणि मंत्री अदिती तटकरे यांच्यात मोठी रस्सीखेच सुरू होती. मात्र, विधानपरिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाने राष्ट्रवादीचे उमेदवार अनिकेत तटकरे यांना सहकार्य करत स्वतःचा उमेदवारी अर्ज मागे घेतला. यामुळे अनिकेत तटकरे यांची निवड बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला. या राजकीय तडजोडीनंतर रायगडच्या पालकमंत्रीपदाची माळ अखेर भरत गोगावले यांच्या गळ्यात पडली.

## माचिस मागितली, मारहाण करून सोनसाखळी लंपास




**छत्रपती संभाजीनगर :** चोरट्यांच्या नवीन क्लृप्तीचा बळी रविवारी मध्यरात्री पावणेदोन वाजेच्या सुमारास एन-7 मधील एका रुग्णालयासमोर पवन वैष्णव हा तरुण ठरला. टूर अँड ट्रॅव्हल्स व्यावसायिक असलेले पवन वैष्णव (32, रा. पदमपुरा) आणि त्यांचे मित्र सतीश क्षीरसागर हे दोघे रात्री पावणे दोन वाजेच्या सुमारास एन-7 परिसरातून पायी जात होते. त्या वेळी समोरून आलेल्या तीन अज्ञात चोरट्यांनी त्यांना अडवले आणि माचिस मागितली. पवन यांनी खिशातील माचिस काढून दिली असता, "तुम्हाला लायटर ठेवता येत नाही का?" असे म्हणत तिघांनी थेट शिवीगाळ करत मारहाण सुरू केली. त्यातील एकाने खिशातील तीक्ष्ण चाकू काढून पवन यांच्या गळ्याला लावला आणि त्यांचा मोबाइल हिसकावून घेतला.

या अचानक झालेल्या हल्ल्याने दोन्ही मित्र हादरले. सतीश यांनी मध्यस्थी करत आरोपींची समजूत काढल्याने चोरट्यांनी मोबाइल परत फेकला आणि निघून जाण्यास सांगितले. मात्र, थोडे पुढे गेल्यानंतर पवन यांच्या लक्षात आले की, या झटापटीच्या बहाण्याने चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील 10 ग्रॅमची (1 तोळा) सोन्याची साखळी अत्यंत सफाईदारपणे उडवली होती.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६

# ‘मॅनेजरियल इकॉनॉमिक्स’ हे विद्यार्थी, संशोधक व शिक्षकांसाठी उपयुक्त पुस्तक आहे - प्रा. रामेश्वरजी राठी




**छत्रपती संभाजीनगर** :आजपर्यंत अर्थशास्त्रावर बरीच पुस्तके बाजारात आली परंतू डॉ. नंदकुमार राठी आणि डॉ. आशिष गट्टाणी लिखित मॅनेजरियल इकॉनॉमिक्स हे पुस्तक अतिशय सोप्या भाषेत असून बी.कॉम, एम.कॉम आणि एम.बी.ए. चे विद्यार्थी संशोधक आणि शिक्षकांसाठी (प्राध्यापक) अतिशय उपयोगी आहे असे प्रतिपादन स.भु. महाविद्याल-याच्या अर्थशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. रामेश्वर राठी यांनी केले. प्रा. राठी हे विद्याबुक्सच्या वतीने प्रकाशित आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्राचे संचालक डॉ. नंदकुमार राठी तसेच आदर्श महाविद्यालय हिंगोलीचे वाणिज्य विभागप्रमुख डॉ. आशिष गट्टाणी लिखित मॅनेजरियल इकॉनॉमिक्स या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स.भू. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व माजी अधिष्ठाता डॉ. शिवशंकर मिश्रा हे होते. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. सय्यद अझरोद्दीन माजी व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. संतोष लोमटे, विद्यापीठाच्या वाणिज्य विभाग-प्रमुख डॉ. गौरी फराह, डॉ. वीणा हुबे, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ.एम.डी. जहागिरदार, डॉ. मुकीद, डॉ. विलास इप्पर, डॉ. मोहन डोईबळे, सुनील कस्तुरे, ओम झालानी, ज्येष्ठ लेखापरीक्षक सी. एन. भंसाली, सुनील काला, उद्योगपती राजेश चंचलानी, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरूवातीला दोन्ही लेखक महोदयांनी आपले मनोगत व्यक्त केले तर प्रकाशक शशिकांत पिंपळापूरे, डॉ. स्मीता शिंदे आणि सौ. कोमल गट्टाणी, अनिरूद्ध पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ च्या वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. सय्यद अझरोद्दीन यांनी हे पुस्तक अर्थशास्त्र, वाणिज्य किंवा व्यवस्थापन विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांनाच नाहीतर NEP अंतर्गत प्रत्येक विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त असे पुस्तक असल्याचे सांगितले. तर वाणिज्य विभागप्रमुख डॉ. गौरी फराह यांनी पुस्तकाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकत जागतिक संदर्भासह भारतीय ज्ञान परंपरेचा दाखला देत पुस्तकाची उपयुक्तता विषद केली.

कार्यक्रमाचे अध्यक्षीय मारोप करतांना डॉ. शिवशंकर मिश्रा यांनी अर्थशास्त्र हा वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखेचा कणा असून या महत्त्वाच्या विषयावर अतिशय चांगल्या अशा पुस्तकाची आवश्यकता होती, त्याची पुर्तता मॅनेजरियल इकॉनॉमिक्स या पुस्तकाने केल्याचे सांगून दोन्ही लेखक आणि प्रकाशकाचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्राचार्य डॉ. हसन इनामदार यांनी केले तर प्रा. सय्यद नबाब यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## किशोर आवारे खून खटल्यात साक्षीदारांवर दबाव आणल्याचा आरोप:

**पुणे** : तळेगाव दाभाडे येथील जनसेवा विकास समितीचे अध्यक्ष किशोर आवारे यांच्या खून खटल्यात साक्षीदारांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप आहे. साक्ष बदलण्यासाठी धमकी, बंदुकीचा धाक, मध्यरात्री घरी जाऊन धमकावणे तसेच पोलिस संरक्षण काढून घेण्यात आल्याचे दावे साक्षीदारांनी पिंपरीतील पत्रकार परिषदेत केले. आवारे यांच्या हत्येसाठी 20 लाख रुपयांचा व्यवहार झाल्याचा दावाही यावेळी केला. किशोर आवारे यांची 12 मे 2023 रोजी तळेगाव नगरपरिषदेसमोर गोळ्या झाडून हत्या झाली. या प्रकरणाचा सत्र खटला क्रमांक 54/2023 वडगाव मावळ येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात सुरू आहे. तपासातील इलेक्ट्रॉनिक पुरावे आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब महत्त्वाचे असल्याचे प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. साक्षीदार मोहसीन मुलाणी यांनी हत्येपूर्वी कटाची माहिती मिळाल्याचा आणि आवारे यांना सावध केल्याचा दावा केला. सुधाकर शेळके यांनी आपल्यासमोर आवारे यांच्या हत्येसाठी 20 लाख रुपये दिल्याचा दावा मुलाणी यांनी केल्याचे म्हटले आहे. जबाब बदलण्यासाठी आपल्यावर दबाव आणल्याचाही त्यांचा आरोप आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आकाश जगताप यांनी घटनेचे मोबाईलमध्ये चित्रीकरण केल्याचा दावा केला आहे. संदीप गराडे यांनी डोक्याला बंदूक लावून साक्ष देऊ नये, अशी धमकी दिल्याचा आरोप जगताप यांनी केला आहे. अनिल पवार यांनी पोलिस संरक्षण काढून घेतल्याचा, तसेच राजकीय पदाचा गैरवापर करून आपल्यावर मोक्का कारवाई केल्याचा दावा केला. संदीप गराडे यांनी फोनवरून धमकी दिल्याचाही आरोप त्यांनी केला. दत्तात्रय पारगे यांनी जानेवारी 2026 मध्ये खोटी साक्ष देण्यासाठी दबाव आणल्याचा, तर 30 मार्चला मध्यरात्री घरी येऊन धमकावल्याचा दावा केला.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६


## विश्वबंधुत्व दिनानिमित्त डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालयात विशेष कार्यक्रम संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील डॉ. सौ. इं. भा. पाठक महिला महाविद्यालयात आजीवन अध्ययन व विस्तार केंद्राच्या वतीने 'विश्वबंधुत्व दिन' अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. स्वामी विवेकानंद यांनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथील जागतिक धर्मपरिषदेत दिलेल्या ऐतिहासिक भाषणाच्या स्मृतीप्रित्यर्थ हा दिवस दरवर्षी 'विश्वबंधुत्व दिन' म्हणून साजरा केला जातो.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल तर, प्रमुख व्याख्याते प्रा. किरण कुलकर्णी लाभले होते . या कार्यक्रमाला कनिष्ठ विभागाच्या पर्यवेक्षिका प्रा.माधुरी भावसार आणि आजीवन शिक्षण विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. मीनाक्षी देव-निमकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल आणि मार्गदर्शक प्रा. किरण कुलकर्णी यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रा किरण कुलकर्णी यांनी, स्वामी विवेकानंद हे अलौकिक बुद्धिमत्ता लाभलेले विभूती होते. त्यांनी जगामध्ये सहिष्णूता आणि सर्वधर्म समभाव निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. भारताचे प्रतिनिधित्व शिकागो येथील सर्वधर्म परिषदेमध्ये करीत असताना त्यांनी विश्वशांती आणि सामाजिक एकतेचा संदेश जगाला दिला. हिंदू संस्कृती ही जगामध्ये एक आदर्श संस्कृती असून या संस्कृती मधील प्राचीन ग्रंथ हे ज्ञानाचे भांडार आहेत. अशा प्रकारचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपा मध्ये प्राचार्य डॉ. अन्विता अग्रवाल यांनी स्वामीजींच्या आचार विचार आणि कार्याचा आजच्या तरुणांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रकटन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या कार्यक्रमाधिकारी डॉ मीनाक्षी देव-निमकर यांनी केले .या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कार्यशाळेचे तेरणा हायस्कूल मध्ये आयोजन



**तेरणा :** तेरणा हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणपती बाप्पाची मूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून आकर्षक आणि पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कशी बनवावी याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. प्लास्टर ऑफ पॅरिसला फाटा देत पर्यावरण रक्षणाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मुर्तीकार ओमकार वाकडे यांनी प्रशिक्षण दिले.शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास मुख्याध्यापक के. पी. पवार, केशवराव मुंडे, रमेश प्रधान, प्रदीप भाले, रमेश जोशी, भाग्यश्री काळे, उषा उदगे, माधुरी काटकर, दिपाली चांडे, सिंधू बोर्डे यांची उपस्थिती होती.विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संकल्प केला.

## तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत मुरूम कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींचा विजय



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत भारत शिक्षण संस्था संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, मुरूम येथील मुलींनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपद पटकावले.या स्पर्धेत महाविद्यालयाच्या कृतिका गोपाळ इंगोले, साक्षी सिद्धाप्पा कुंचगे, अपसाना गुंडु कुरणे, तेजस्विनी उमेश खजूरे आणि तस्लिम अलताफ जमादार यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उल्लेखनीय कामगिरी केली. खेळाडूंनी कौशल्य, चिकाटी आणि सांघिक भावना यांच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले, शिक्षकवृंद, क्रीडा विभागप्रमुख बालाजी इंगोले तसेच क्रीडाप्रेमींनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. तसेच आगामी स्पर्धांसाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## जिंतूर-येलदरी-सेनगाव उर्वरित १९ किलोमीटरच्या कामास ३४० कोटी रुपयांची मंजुरी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** एशियन डेव्हलमेंट बँक (ADB) या योजने अंतर्गत जिंतूर मतदार संघातील जिंतूर येलदरी सेनगाव रस्त्याची सुधारणा करणे ( किमी 55/600 ते 70/600) या कामास तब्बल 340 कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले असून सदरील रस्ता हा सीमेंट कॉंक्रिट चा होणार असून यात 34 किमी लांबी समाविष्ट करण्यात आली आहे. यामध्ये जिंतूर ते येलदरी या रस्त्याची दयनीय अवस्था लक्षात घेता आणि हाच महामार्ग पुढे मराठवाडा आणि विदर्भाशी जोडणारा महत्वाचा महामार्ग असल्याने प्राधान्याने हा रस्ता पूर्ण करण्यात येणार असून पुढील येलदरी ते सेनगाव रस्त्याचे काम यापूर्वीच पूर्ण झाले असल्याने या कामा ऐवजी उर्वरित 19 किमी लांबीचा सुधारीत रस्ता रामा 248 सावंगी म्हाळसा सावली इटोली पोखरणी तांडा चिंचोली दराडे वस्सा आसेगाव दुधगाव प्रजिमा 7 प्रस्तावित करून महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री आदरणीय मा.नामदार मेघना साकोरे बोर्डीकर यांनी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.ना.श्री.शिवेंद्रराजे भोसले यांची मंत्रालय मुंबई येथे प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना या सुधारित कामाचे निवेदन दिले आणि या संदर्भात मा.मंत्री महोदय यांनी या बाबत तत्काळ कामाचा सर्व्हे करण्यात येणार असून DPR (Detils Project Report) तयार करून अंदाजपत्रक सादर करण्यात येणार असल्याचे आश्वस्त करून संबंधित विभागास लवकर कार्यवाही करण्या बाबत सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती भाजपाचे सुनील भोंबे यांनी प्रतिनिधींना दिली.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड., एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

## द्रोण

अबोलप्रीती
एक अनवट प्रेमकथा

फार फार वर्षांपूर्वी गण्डकी नदी किनारी 'सारसनगर' नावाचं एक राज्य होतं. त्या राज्याचा सूर्यसेन हा राजा होता. सारसनगर हे एक समृद्ध, सुपिक राज्य होतं. सूर्यसेन महाराज आपल्या प्रजेची खूप काळजी घेत असत. सारसनगरची प्रजा सुखी होती. महाराणी सुदेष्णा व सूर्यसेन राजाला मुलगा नव्हता, फक्त एकच मुलगी होती. त्या राजकुमारीचे नांव होते 'सुगन्धा' तिची एक जीवलग मैत्रीण होती, तिचे नांव होते 'रजनी'. रजनीचे वडील गोविंदशास्त्री राजपुरोहित होते. दोघी कायम बरोबरच असत. एकत्रच खेळत असत.

एकदा काय झाले, शाकम्भरी पौर्णिमेचे दिवशी सकाळीच दोघी शाकम्भरी देवीच्या दर्शनाला गेल्या. तेथे भाविकांची खूप गर्दी होती. पण त्या दोघींनी रीतसर रांगेत उभे राहून दर्शन घेतले. नंतर त्या दोघी घाटावर आल्या. नदीच्या एका शान्त डोहाकडे पाहून त्यांना पोहण्याचा मोह काही आवरता आला नाही. त्या डोहात मनसोक्त पोहून बाहेर आल्या. त्यांचे कपडे भिजले होते, केसही ओले झाले झाले होते आणि खूप भूकही लागलेली होती. मग परत मंदिरात जावून त्यांनी प्रसाद म्हणून आलेला बोरे, घाटे, आवळे, करवन्दे असा बराच रानमेवा घेतला. मग त्यांच्या नेहमीच्या खेळायच्या ठिकाणी, पळसाच्या झाडाजवळ त्या आल्या. तेथे त्यांनी आपापल्या वेण्या सोडल्या आणि केस मोकळे केले. त्यांचा आवडीचा खेळ म्हणजे 'सात खळगे'. तेथे एका मोठ्या दगडावर थोडी जागा सपाट करून, त्या सपाटीवर एक ओळीत सात खळगे कोरलेले होते. त्या खळग्यांच्या एका बाजूला सात पावले अंतरावर असे उभे रहायचे की ते सातही खळगे आपल्याला एका रांगेत एकामागे दुसरे असे दिसले पाहिजेत. त्या खळग्यात एकानी क्रमशः शेवटच्या खळग्यापासून सुरूवात करून पहिल्या खळग्यात एक एक करत आपली गोटी जागेवरच उभे राहून त्या सातही खळग्यात गेली पाहिजे अशी फेकायची. चौदा वेळा गोटी फेकायची सन्धी पहिल्या खेळाडूला मिळते. त्या चौदामध्ये जेवढ्या गोट्या खळग्यात जातील तेवढ्याच, समजा चारच गोट्या खळग्यात गेल्या तर चारच. पहिल्या खेळाडूचा डाव सम्पला. आता दुसऱ्याने त्या खळग्यातील गोट्या आपल्या गोटीने एक एक करत शेवटून सुरूवात करून बाहेर काढायची. पहिला खेळाडू जिथे उभा राहिला तिथेच उभे राहून आपल्या हातातील गोट्या फेकायच्या. मात्र दुसऱ्या खेळाडूला गोटी मारण्याची सन्धी फक्त चौदा वेळाच मिळत असे. पण अशा प्रकारे गोटी बाहेर काढताना दुसऱ्या गोटीला आपल्या किंवा इतर कोणत्याही गोटीचा स्पर्श होता कामा नये. जर स्पर्श झाला तर बाद. मग तो खेळाडू हरला. जितक्या गोट्या बाहेर काढल्या तेवढे गुण दुसऱ्या खेळाडूला मिळाले. जेवढ्या गोट्या शिल्लक राहिल्या तेवढे गुण पहिल्या खेळाडूला मिळाले. मग परत डावाची उलटापालट. अशा प्रकारे दोन डाव खेळून जो जितके जास्त गुण मिळवेल तो जिंकला. असा हा सात खळगे खेळ त्या दोघी खेळता खेळता, सोबत आणलेला रान मेवा खाता खाता वेळ कसा गेला ते कळलेच नाही. एव्हाना त्या दोघींचे केस चांगलेच वाळले होते. मग सुगन्धाने रजनीची छान वेणी घातली. नंतर रजनीने सुगन्धाची वेणी घातली. पण रजनी वेणी घालत असताना सुगन्धाने जवळच पडलेली पळसाची पाने गोळा केली, त्याचा एक सुन्दर मोठा द्रोण तयार केला. तो द्रोण रजनीला दाखविला आणि म्हणाली, "हा द्रोण पाण्यावर जर टाकला तर बुडणार नाही, तरंगेल असाच बनविला आहे."

"आपण त्यात दोन-तीन बोरे ठेवून सोडून पाहू बरे पाण्यात." - रजनी. "नको... बोरांच्या वजनानी तो द्रोण बुडेल. त्यापेक्षा तुझ्या केसांचे हे गुंतवळे आहे ना ते ठेवू या द्रोणात." - सुगन्धा. "माझे कशाला, तू द्रोण बनविला आहेस... तुझ्याच केसांचे गुंतवळे ठेव की मग त्या द्रोणात..." - रजनी. "हां... हे बरोबर आहे. हे बघ माझे केस ठेवले या द्रोणात. जा ओता सोडून ये..." - सुगन्धा.

"नाही, द्रोण कोणी बनविला... ? मग तूच सोडून ये... जर तो द्रोण बूडला, तर मग माझ्यावरच नाव घेशील की मी द्रोण काळजीपूर्वक पाण्यात सोडला नाही." - रजनी.

"हां. ठिक आहे... माझा द्रोण पाण्यात बुडणारच नाही. तुला दाखवतेच..." - सुगन्धा.

असे बोलता बोलता दोघी डोहापर्यंत पोहोचल्यासुद्धा. मग सुगन्धाने हळूच त्या शान्त डोहात गुडघाभर पाण्यात उतरून द्रोण अलगद सोडून दिला. तो द्रोण तरंगत तरंगत हळूहळू पुढे पुढे जात राहिला. बघता बघता त्या डोहातून बाहेर पडून मुख्य प्रवाहात सामिल झाला. रजनीला वाटले आता तरी तो बुडेल. पण छे ! तो द्रोण बुडालाच नाही. तो तसाच वाहात वाहात पुढे पुढे जातच राहिला. शेवटी तो त्या दोघींच्या दृष्टी आड झाला. मग सुगन्धा म्हणाली, "बघितलंस मी किती चांगला द्रोण बनविला ते..." एव्हाना बराच वेळ होऊन गेला होता. त्या दोघी आता राजवाड्याकडे गेल्या.

कथेचे नाव : अबोलप्रीती : एक अनवट प्रेमकथा.




**नाव : अनिकेत भालेराव.**
पत्ता : १२, वासुदेवानंद, ६५१, नारायण पेठ, पुणे ४११ ०३०.
aniket.bhalerao@rocketmail.com


## मराठा आरक्षणावर राऊतांचा सरकारला सवाल



**रत्नागिरी :** ओबीसी नेत्यांच्या इशाऱ्यांवर आणि आरक्षणाच्या वादावर शिवसेनेची (ठाकरे गट) भूमिका स्पष्ट करताना राऊत म्हणाले, "ज्या समाजाला जे आरक्षण मिळाले आहे, त्याला कोणीही हात लावू नये, या मताचे आम्ही आहोत. ओबीसींच्या कोट्यातून कुणबी म्हणून आरक्षण कमी करून ते मराठा समाजाला द्यावे, अशा मताचे आम्ही मुळीच नाही. त्याव्यतिरिक्त जे काही द्यायचे असेल, त्याबाबतचा ठोस निर्णय सरकारने घ्यावा." सणांमधील डीजेच्या वापरावरूनही त्यांनी सरकारवर दुटप्पीपणाचा आरोप केला. "डीजेसारख्या घातक वाद्याचा वापर करून जो त्रास होतो, त्याऐवजी दुसरा मार्ग स्वीकारण्याची आवश्यकता आहे. एकीकडे सरकार नागपूर आणि पनवेलसारख्या ठिकाणी डीजेवर बंदी घालते आणि दुसरीकडे आपले धोरण स्पष्ट करत नाही. गृहमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचे धोरण स्पष्ट केले पाहिजे," अशी मागणी राऊत यांनी केली.

दिशा सालियन प्रकरण आणि 'ऑपरेशन टायगर'

दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरे यांचे नाव पुन्हा चर्चेत आणल्याबद्दल विचारले असता, त्यांनी एका वाक्यात जोरदार प्रहार केला. "हे म्हणजे मेलेले मढे पुन्हा एकदा उकरून काढण्याची पद्धत आहे," असे ते म्हणाले. तसेच, नवरात्रीत राबवल्या जाणाऱ्या कथित 'ऑपरेशन टायगर'वर टीका करताना ते म्हणाले, "ज्यांना खरेदी-विक्री करून आपला पक्ष चालवण्याची सवय लागली आहे, त्यांचा स्वतःच्या निर्मितीवर विश्वास राहिलेला नाही. पैशाचा वारेमाप वापर करून दुसऱ्यांचे लोकप्रतिनिधी विकत घेण्याच्या त्यांच्या धंद्याला जनता विटली असून, जनता त्यांना नक्कीच धडा शिकवेल."

पक्षप्रमुखांचे कोकणाकडे दुर्लक्ष? राऊतांचा मोठा खुलासा

ठाकरे गटाचे वरिष्ठ नेतृत्व (उद्धव आणि आदित्य ठाकरे) कोकणात फारसे दौरे करत नाहीत, असा आक्षेप विरोधकांकडून आणि कार्यकर्त्यांकडून घेतला जातो. यावर स्पष्टीकरण देताना विनायक राऊत म्हणाले, "पावसाळ्यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. अशा वेळी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांना दौरे करून वेठीस धरण्याऐवजी, वरिष्ठ नेतृत्व मुंबईतूनच त्यांच्याशी सातत्याने संपर्कात आहे. मागील आठवड्यातच रत्नागिरी, संगमेश्वर, चिपळूण येथील पदाधिकाऱ्यांनी मातोश्रीवर जाऊन चर्चा केली आहे. पावसाळा संपताच पक्षप्रमुख प्रत्येक जिल्ह्यानिहाय ग्रामीण भागाचे दौरे आणि मेळावे सुरू करणार आहेत."







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६

## गर्वाच्या नादात

मोठेपणा मिळविण्यासाठी,
आता सारेच पडले वादात.
मित्रा तुझे माझे करता करता,
नाते गमावले गर्वाच्या नादात. 1

क्षणिक गर्व जीवनभराचे,
नातेसंबंध तोडून टाकले.
मित्राचीच जिरवण्यासाठी,
नको तिथे जाऊन वाकले. 2

तुझे माझे कुठलेच नाही वैर,
तरीपण जिवलगाशी भांडतो.
सुखी जीवन जगता जगता,
स्वतः दुःखाचा बाजार मांडतो. 3

गर्व मोठेपणा बाजूला सारून,
माणूस म्हणून जगता यावे.
मित्रा हेवे दावे विसरून सारे
संकटात माणसाला साथ द्यावे. 4

माणूस म्हणून जगता जगता,
होईल तितके प्रेम वाटावे.
आयुष्यात जगतांना आनंदात,
प्रेम वाटून मैत्रीचे नाते थाटावे. 5



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## बहिरगाव शाळेत 'बीजगणेशा' तून पर्यावरण संवर्धनाची संकल्पना



**कन्नड (अरुण थोरात) :** जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव, ता. कन्नड येथे विद्यार्थ्यांमध्ये भक्तिभावासोबतच पर्यावरण संवर्धनाची जाणीव रुजविण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय हरित सेना व इकोक्लबअंतर्गत मातीपासून बीजगणेश निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विभागीय वनाधिकारी संदीप गिरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अनोख्या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कलाशिक्षक सलीम आत्तार व स्थानिक कलाकार राजू शिरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी कलाशिक्षक सलीम आत्तार यांनी विद्यार्थ्यांना नैसर्गिक मातीचा वापर करून बीजगणेशाची मूर्ती कशी तयार करावी, याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच 'कलेतून पर्यावरण संवर्धन' या संकल्पनेविषयी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.बीजगणेशाच्या मूर्तीमध्ये पर्यावरणपूरक बियांचा वापर करून गणेशोत्सवानंतर मूर्तीचे विसर्जन केल्यावर त्यातून रोपांची निर्मिती होऊ शकते, हा पर्यावरणपूरक संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. त्यामुळे भक्ती, सर्जनशीलता आणि पर्यावरण संवर्धन यांचा सुंदर संगम या कार्यशाळेत पाहायला मिळाला.या कार्यशाळेत प्रशालेतील जवळपास 100 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वतःच्या हाताने बीजगणेश तयार केले. विद्यार्थ्यांनी मातीला आकार देताना आपल्या कलात्मक कौशल्याचा व सर्जनशीलतेचा सुंदर आविष्कार घडविला. कार्यशाळेस प्रशालेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब घोलप, वनरक्षक संध्या खाडे तसेच प्रशालेतील शिक्षक दिलीप महाजन, कुलभुषण व्यवहारे, राजेद्र शिंपी, नुतन पवार, शाम खोसरे, सलिम आतार, राधेशाम शर्मा, श्रीमती किरण पाटील, स्वप्नील गांगुर्डे , गणेश बल्हाळ रविद्र ठाकरे किसनाबाई गोरे, सविता कुंटे यांनी विद्यार्थ्यांना सहकार्य केले. व पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणारा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरला.

## स. भु. प्रशालेत पर्यावरणपूरक मूर्ती कार्यशाळा संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत 'पर्यावरण पूरक श्रीगणेश मूर्ती बनवा कार्यशाळा' घेण्यात आली. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, उपस्थित होते. सरस्वती भुवन प्रशालेतील कलाशिक्षक विजय चापाईतकर, विजय पिंपळे तसेच शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयातील छात्राध्यापक यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले. कला शिक्षकांनी अडीचशे विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. प्लास्टर ऑफ पॅरिस ऐवजी मातीची गणपती मूर्ती तयार करणे सुरक्षित पर्यावरणासाठी अतिशय महत्वाचे कसे आहे, याबद्दलही मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून गणपती मूर्ती बनवण्याचा अनुभव अतिशय आनंदाने घेतला. पाहुण्यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यार्थ्यांनी उत्साहाने आणि आनंदाने उत्तम अशा श्री गणपती मूर्ती तयार केल्या. श्री स. भु. प्रशालेने श्री गणेशोत्सवाच्या निमित्ताने पर्यावरणाबाबत जागृती करण्याचा केलेला हा प्रयत्न स्तुत्य, अनुकरणीय आहे. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ, उपमुख्याध्यापक गिरीश देशमुख यांनी सर्व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. संकेत आव्हाड, आदित्य कोलते, योगिता चव्हाण, दीपिका मुटकुळे, ज्ञानेश्वर कोल्हे, उमेश लोहार, चंचल राठोड, रुद्र भालेराव, रोहन साबळे, रूपाली लकवाल, गौरव गवळी, शेळके या कला छात्रशिक्षकांचे स्वागत आणि कौतुक संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी किशोर पाटील, विनोद सिनकर, छाया महाजन,अंजली कोलते, विजय पाताळयांत्री, संदीप घुगे,उषा जाधव, चंद्रकला हंडे, अर्चना मुळे आदी शिक्षकांनी प्रयत्न केले. या आगळ्यावेगळ्या कार्यशाळेबद्दल पालकांनीही विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## इकरा पब्लिक स्कूलमध्ये 'मिशन AICU' वर्गांना महाराष्ट्र उर्दू अकादमीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट





**जळगाव :** जळगाव येथील इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये राबवण्यात येणाऱ्या 'मिशन AICU' उपक्रमांतर्गत चालवल्या जाणाऱ्या विशेष वर्गांना महाराष्ट्र उर्दू अकादमीचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) सय्यद शोएब हाश्मी यांनी 9 सप्टेंबर 2026 रोजी सदिच्छा भेट दिली.डॉ.अब्दुल करीम सालार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून यशस्वीरीत्या राबवला जात आहे.इंग्रजी, मराठी किंवा गुजराती यांसारख्या इतर माध्यमांतून सेमी-इंग्रजी अथवा उर्दू माध्यमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरुवातीला उर्दू भाषेची अडचण भासते; अशा विद्यार्थ्यांना भाषेचे आकलन सुलभ व्हावे आणि ते मुख्य शैक्षणिक प्रवाहात सहज सामील व्हावेत,हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.हा उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि सुटसुटीत नियोजनावर आधारित आहे. नियमित तासांचे नुकसान होऊ नये म्हणून 'झिरो-ओवर पीरियड'मध्ये विद्यार्थ्यांना वाचन व लेखनाचे धडे दिले जातात.सलग 90 दिवसांच्या या विशेष प्रोग्राममध्ये प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष केंद्रित करण्यासाठी स्वतंत्र ट्यूटरची (वन-टू-वन प्रोजेक्ट) व्यवस्था करण्यात आली आहे.याशिवाय, आठवडाभरात शिकवलेल्या घटकांचे आकलन तपासण्यासाठी दर शनिवारी नियमित परीक्षा घेतली जाते. या शास्त्रोक्त पद्धतीमुळे आतापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांनी उर्दू भाषा आत्मसात करून आपल्या मूळ अभ्यासात उत्तम प्रगती साधली आहे.भेटीदरम्यान सय्यद शोएब हाश्मी यांनी वर्गातील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला आणि त्यांना उर्दू पुस्तकातील शब्द, वाक्ये व परिच्छेद वाचायला लावले. विद्यार्थ्यांनी अत्यंत आत्मविश्वासाने व अचूकतेने वाचन करून दाखवल्याने हाश्मी यांनी तीव्र समाधान व आनंद व्यक्त केला. इकरा पब्लिक स्कूलचे हे शैक्षणिक मॉडेल अत्यंत कौतुकास्पद असून अशा प्रकारचे 'मिशन AICU' वर्ग राज्यातील इतर सर्व शाळांमध्येही मोठ्या प्रमाणावर सुरू व्हायला हवेत, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.शेवटी, त्यांनी या उत्कृष्ट उपक्रमाबद्दल शाळेच्या सर्व संस्थापकांचे व शिक्षकांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## श्री सरस्वती भुवन प्रशालेत भाषण कट्टा सुरू



**छत्रपती संभाजीनगर :** उत्तम अभिव्यक्तीसाठी संभाषण आणि भाषण कौशल्य जीवनात महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन गांधीवादी विचारवंत ज्ञानप्रकाश मोदाणी यांनी केले. स.भु. प्रशालेतील 'भाषणकट्टा' उपक्रमाचे उद्घाटन त्यांनी केले. श्री सरस्वती भुवन प्रशालेच्या पूर्व माध्यमिक विभागात विद्यार्थ्यांसाठी 'भाषणकट्टा' उपक्रम सुरू करण्यात आला. शाळेतील 'वाचन कट्टा' आणि 'ई लायब्ररी कॉर्नर' प्रमाणेच 'भाषणकट्ट्या'त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन प्रशालेचे मुख्याध्यापक विश्वरूप निकुंभ यांनी केले. या उपक्रमाच्या आयोजनामागची भूमिका डॉ. विनोद सिनकर यांनी स्पष्ट केली. याप्रसंगी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक गिरीश देशमुख पर्यवेक्षक विजय चापाईतकर उपस्थित होते. याप्रसंगी आयत्यावेळी दिलेल्या विषयावर कु. धनश्री शिवाजी मदन, चि.रणवीरसिंह विलास गायकवाड व कु. भावना मुंजा डख या इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपले विचार मांडले. या विद्यार्थ्यांचे कौतुक उपस्थित मान्यवरांनी केले. हा 'भाषण कट्टा' दर शनिवारी घेण्यात येईल असे मुख्याध्यापकांनी आवर्जून सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विनोद सिनकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विजय पिंपळे, विजय पाताळयंत्री, किशोर पाटील, शुभांगी पांगरकर या शिक्षकांनी सहकार्य केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६


# लोकभाषेतून समतेचा संदेश : श्रीचक्रधरस्वामींचे समाजप्रबोधन

महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक इतिहासात बारावे-तेरावे शतक हा परिवर्तनाचा महत्त्वाचा कालखंड मानला जातो. या काळात समाजजीवनावर कर्मकांड, रूढी, जातिभेद, वर्णभेद आणि धार्मिक वर्चस्व यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर होता. अशा परिस्थितीत सामान्य माणसाच्या जीवनाशी निगडित प्रश्नांना स्पर्श करणारा, लोकभाषेतून तत्त्वज्ञान समजावून सांगणारा आणि मानवतेला केंद्रस्थानी ठेवणारा विचारप्रवाह महाराष्ट्रात आकाराला आला. या परिवर्तनाच्या प्रवाहातील अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे श्रीचक्रधरस्वामी होय. महानुभाव पंथाचे प्रवर्तक म्हणून त्यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात महत्त्वाचे आहे. लोकभाषेचा आग्रह, सर्वसामान्यांपर्यंत विचार पोहोचविण्याची भूमिका, अहिंसेचा पुरस्कार, जातिभेदाविरुद्धची भूमिका, स्त्रियांना अध्यात्मिक मार्गाची संधी आणि मराठी भाषेच्या विकासाला मिळालेली चालना या विविध अंगांनी श्रीचक्रधरस्वामींच्या कार्याचे सामाजिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित होते. त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा समकालीन संदर्भात विचार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.मराठी विश्वकोशानुसार त्यांचे मूळ नाव हरिपाळदेव होते. पुढे त्यांनी महाराष्ट्रात येऊन व्यापक भ्रमंती केली आणि आपल्या विचारांचा प्रसार केला. त्यामुळे त्यांच्या चरित्राचा अभ्यास करताना भक्तिपरंपरा, साहित्यिक स्रोत आणि इतिहासाधारित माहिती यांचा योग्य संदर्भात विचार करणे आवश्यक ठरते. त्यांच्या जीवनाचे महत्त्व तत्कालीन समाजाला विचार करण्यास भाग पाडणाऱ्या प्रश्नांमध्ये आणि त्यांच्या उपदेशाच्या सामाजिक परिणामांत आहे.श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांची सर्वांत महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण बाजू म्हणजे त्यांनी आपले तत्त्वज्ञान लोकांच्या भाषेत मांडले. त्या काळात संस्कृत ही विद्वत्तेची आणि धार्मिक ग्रंथांची प्रमुख भाषा होती. त्यामुळे सामान्य जनतेला तात्त्विक विचार सहज उपलब्ध होत नसत. श्रीचक्रधरस्वामींनी मात्र मराठीचा स्वीकार करून सामान्य माणसाशी थेट संवाद साधला. मराठी विश्वकोशात नमूद केल्याप्रमाणे ते स्वतः गुजराती भाषिक असूनही मराठी भाषेतून आपल्या विचारांचा प्रसार करीत. हा केवळ भाषेचा बदल नव्हता, तर ज्ञानाच्या सामाजिक लोकशाहीकरणाची प्रक्रिया होती. ज्ञान काही मोजक्या विद्वानांच्या हातात मर्यादित न राहता सामान्य जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे, या भूमिकेचा त्यात प्रत्यय येतो.याच कारणामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा संबंध मराठी भाषेच्या प्रारंभीच्या विकासाशी जोडला जातो. त्यांच्या शिष्यांनी आणि अनुयायांनी पुढे मोठ्या प्रमाणावर ग्रंथनिर्मिती केली. म्हाइंभटांनी संकलित केलेले 'लीळाचरित्र' हे मराठीतील आद्य चरित्रग्रंथ मानले जाते. श्रीचक्रधरांच्या जीवनातील विविध प्रसंग, संवाद आणि उपदेश यांचे संकलन या ग्रंथात झाले. या ग्रंथाचे महत्त्व केवळ महानुभाव पंथाच्या दृष्टीने नाही, तर तत्कालीन मराठी भाषेचे स्वरूप, सामाजिक जीवन आणि लोकव्यवहार समजून घेण्यासाठीही आहे. मराठी विश्वकोशानुसार 'लीळाचरित्र' साध्या, सरळ आणि घरगुती गद्यभाषेत लिहिले गेले असून त्यातून त्या काळातील व्यवहारातील मराठीचे दर्शन घडते.श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांमध्ये मानवतेला विशेष स्थान आहे. त्यांच्या उपदेशात अहिंसेचा पुरस्कार आढळतो. हिंसा, द्वेष, अन्याय आणि सामाजिक भेदभाव यांच्या पलीकडे जाऊन मानवी जीवनाकडे पाहण्याची भूमिका त्यांच्या विचारांमध्ये दिसते. महानुभाव पंथाने जातिनिरपेक्षता आणि अहिंसेचा पुरस्कार केला, असे मराठी विश्वकोशातील विवेचनातून स्पष्ट होते. या भूमिकेचा तत्कालीन सामाजिक संदर्भ लक्षात घेतला तर त्याचे महत्त्व अधिक जाणवते. समाजात जन्माधारित श्रेष्ठ-कनिष्ठतेच्या कल्पना प्रबळ असताना मानवाच्या आध्यात्मिक क्षमतेचा विचार जन्मावर न करता त्याच्या आचरणाशी जोडणे ही परिवर्तनशील भूमिका होती.श्रीचक्रधरस्वामींच्या विचारातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे मोक्षमार्ग सर्वांसाठी खुला असावा, ही भूमिका. त्या काळातील धार्मिक जीवनात सामाजिक स्तरानुसार अनेक प्रकारच्या मर्यादा अस्तित्वात होत्या. महानुभाव परंपरेत स्त्रिया आणि समाजातील विविध स्तरांतील व्यक्तींना आध्यात्मिक साधनेची संधी मिळाल्याचे उल्लेख आढळतात. स्त्री-शूद्रांना मोक्षमार्ग खुला करण्याच्या भूमिकेचा उल्लेख महानुभाव पंथाच्या अभ्यासात केला जातो. त्यामुळे आध्यात्मिक समानतेची कल्पना ही त्यांच्या परंपरेतील महत्त्वाची बाब मानता येते. आजच्या संविधानिक समतेच्या युगात या विचारांकडे पाहताना त्यातील मानवकेंद्री मूल्य विशेष अधोरेखित होते.श्रीचक्रधरस्वामींचे कार्य समजून घेताना त्यांचे गुरू श्रीगोविंदप्रभू यांचाही संदर्भ महत्त्वाचा आहे. महानुभाव परंपरेनुसार गोविंदप्रभू हे चक्रधरस्वामींचे गुरू होते. गोविंदप्रभूंच्या जीवनचरित्रातही रूढ सामाजिक चौकटींपलीकडे जाणारे मानवतावादी वर्तन दिसते. अनाथ आणि असहाय व्यक्तींना आधार देणे, सामाजिक भेदांच्या पलीकडे जाणे आणि माणसाला माणूस म्हणून स्वीकारणे या गुणांचा उल्लेख त्यांच्या चरित्रपरंपरेत आढळतो. या गुरुपरंपरेतून चक्रधरस्वामींच्या विचारांना आकार मिळाला, असे महानुभावीय साहित्याच्या संदर्भातून दिसून येते.श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे कर्मकांडापेक्षा अंतःकरणातील आचरणाला दिलेले महत्त्व होय. धर्म हा केवळ बाह्य विधी, आडंबर किंवा कर्मकांडांपुरता मर्यादित नसावा, तर तो व्यक्तीच्या नैतिक आणि आध्यात्मिक परिवर्तनाशी जोडला गेला पाहिजे, असा त्यांच्या विचारांचा आशय दिसतो. त्यांनी सामान्य माणसाच्या अनुभवविश्वातून तत्त्वज्ञान स्पष्ट केले. त्यामुळे त्यांचा संवाद हा केवळ विद्वानांशी नव्हता; तो शेतकरी, कामकरी, स्त्री, सामान्य गृहस्थ आणि विविध सामाजिक स्तरांतील लोकांशी होता. ज्ञानाची भाषा लोकांना समजणारी असावी, ही त्यांची भूमिका आजच्या शिक्षणव्यवस्थेच्या संदर्भातही महत्त्वाची वाटते.त्यांच्या विचारांमध्ये 'दृष्टांत' या पद्धतीचा वापर विशेष उल्लेखनीय आहे. एखादा अवघड तात्त्विक विचार थेट आणि गुंतागुंतीच्या भाषेत सांगण्याऐवजी दैनंदिन जीवनातील उदाहरणाद्वारे स्पष्ट करणे ही प्रभावी संवादपद्धती आहे. आज शिक्षणशास्त्रात अनुभवाधारित शिक्षण, संदर्भाधारित शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्री शिक्षण यांना मोठे महत्त्व दिले जाते. श्रीचक्रधरस्वामींच्या उपदेशपरंपरेतील दृष्टांतपद्धतीचा विचार केला तर लोकांच्या अनुभवांशी जोडून विचार मांडण्याची ही जुनी आणि प्रभावी परंपरा होती, असे दिसून येते.श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांचा प्रभाव केवळ धार्मिक क्षेत्रापुरता राहिला नाही. महानुभावीय साहित्याने मराठी गद्याला महत्त्वपूर्ण योगदान दिले. चरित्रग्रंथ, सूत्रग्रंथ, भाष्यग्रंथ, तात्त्विक लेखन, काव्य, स्थलवर्णन आणि विविध प्रकारच्या साहित्यनिर्मितीमुळे मराठीच्या अभिव्यक्तीक्षमतेत भर पडली. मराठी विश्वकोशाच्या विवेचनानुसार महानुभावीय वाङ्मयाने प्रारंभीच्या मराठी गद्याचे दालन समृद्ध केले. व्याकरण, तत्त्वज्ञान, साहित्य आणि भाष्यपरंपरेच्या निर्मितीतही या साहित्यपरंपरेचे योगदान आहे. त्यामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या कार्याचा विचार करताना मराठी भाषा आणि साहित्याच्या इतिहासातील त्यांचे स्थान दुर्लक्षित करता येणार नाही.या परंपरेतील महिलांच्या सहभागाचाही स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे. महानुभावीय परंपरेत महदाइसा किंवा महदंबा यांसारख्या स्त्रियांचे योगदान आढळते. महदंबा ही बुद्धिमान आणि विरक्त स्त्री होती, तसेच 'लीळाचरित्रा'च्या संकलनाच्या कार्यात तिची मदत झाली असावी, असे मराठी विश्वकोशातील नोंदीवरून दिसते. या संदर्भामुळे मध्ययुगीन धार्मिक-सांस्कृतिक जीवनात स्त्रियांचा सक्रिय सहभाग आणि त्यांच्या बौद्धिक क्षमतेची दखल घेणाऱ्या परंपरांचा अभ्यास करण्यास नवे आयाम मिळतात.आजच्या काळात श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांकडे पाहताना त्यांचे ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही मध्ययुगीन विचारवंताचे मूल्यमापन आधुनिक मूल्यांच्या चौकटीत सरळपणे करणे योग्य नाही. त्यांच्या काळातील सामाजिक परिस्थिती, धार्मिक व्यवस्था, ज्ञानव्यवस्था आणि भाषिक स्थिती लक्षात घेऊन त्यांच्या कार्याचे मूल्यमापन केले पाहिजे. त्याचबरोबर महानुभाव पंथाच्या पुढील विकासातील काही मर्यादा, अंतर्गत मतभेद आणि आचारविचारांतील बदल यांचाही चिकित्सक अभ्यास झाला पाहिजे. मराठी विश्वकोशातील विवेचनात या पंथाच्या वैचारिक आणि सामाजिक प्रभावाबरोबरच पुढील काळातील काही मर्यादांचाही उल्लेख आहे. त्यामुळे श्रद्धा आणि चिकित्सक इतिहासदृष्टी यांचा समतोल राखणे आवश्यक ठरते.आज भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाची हमी दिली आहे. जात, धर्म, लिंग, भाषा किंवा सामाजिक स्थितीच्या आधारे भेदभाव न करण्याची संविधानिक मूल्यव्यवस्था ही आधुनिक भारताची मूलभूत ओळख आहे. या पार्श्वभूमीवर श्रीचक्रधरस्वामींच्या विचारांतील मानवकेंद्री आणि समतेचा आग्रह असलेल्या पैलूंचा नव्याने विचार करता येतो. सामाजिक समता ही केवळ कायद्याची बाब नसून ती मनोवृत्तीमध्ये रुजली पाहिजे. माणसामाणसांतील भेदभाव कमी करण्यासाठी विचार, शिक्षण आणि सामाजिक संवाद आवश्यक असतो. या दृष्टीने लोकांपर्यंत विचार पोहोचविण्याची श्रीचक्रधरस्वामींची पद्धत आजही प्रेरणादायी ठरू शकते.आज डिजिटल माध्यमांच्या काळात ज्ञानाचा प्रसार पूर्वीपेक्षा अधिक वेगाने होत आहे; परंतु माहितीची विपुलता म्हणजे ज्ञानाची उपलब्धता असे नाही. माहिती समजून घेणे, तिचे चिकित्सक विश्लेषण करणे आणि तिचा समाजहितासाठी उपयोग करणे आवश्यक आहे. श्रीचक्रधरस्वामींनी आपल्या काळात लोकभाषेचा आधार घेऊन ज्ञान सामान्यांपर्यंत पोहोचविले. आजच्या काळातही शिक्षण मातृभाषेत, सोप्या भाषेत आणि लोकांच्या जीवनानुभवांशी जोडून दिले गेले पाहिजे. ग्रामीण, आदिवासी, वंचित, दिव्यांग, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत ज्ञान पोहोचविण्याच्या प्रक्रियेत ही भूमिका विशेष महत्त्वाची आहे.महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात लोकभाषा, लोकजीवन आणि सामाजिक प्रश्न यांचा संबंध अतिशय घनिष्ठ आहे. संतपरंपरा, महानुभाव परंपरा आणि इतर परिवर्तनवादी प्रवाहांनी सामान्य जनतेशी संवाद साधण्यासाठी लोकभाषेचा प्रभावी उपयोग केला. या व्यापक परंपरेत श्रीचक्रधरस्वामींचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यांनी विचाराला लोकांपर्यंत नेले आणि लोकांच्या अनुभवांना तात्त्विक चर्चेचा भाग बनविले. त्यामुळे त्यांचे कार्य हे केवळ एका धार्मिक पंथाच्या इतिहासापुरते मर्यादित न ठेवता महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनाच्या इतिहासाचा एक भाग म्हणून अभ्यासले पाहिजे.श्रीचक्रधरस्वामी जयंती ही केवळ एका महान व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणाचा दिवस न राहता आत्मपरीक्षणाचा दिवस ठरला पाहिजे. आजही समाजात जातीय भेदभाव, सामाजिक विषमता, अंधश्रद्धा, हिंसा, द्वेष, स्त्री-पुरुष असमानता आणि ज्ञानातील दरी यांसारखी आव्हाने आहेत. अशा परिस्थितीत समता, अहिंसा, मानवता, लोकभाषेतील संवाद आणि सर्वांसाठी ज्ञानाची उपलब्धता या मूल्यांचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. कोणत्याही संत-विचारवंताचा खरा सन्मान केवळ जयघोषात नसतो; त्यांच्या विचारातील समाजहितकारी मूल्ये वर्तमान जीवनात आचरणात आणण्यात असतो.श्रीचक्रधरस्वामींच्या कार्याचा व्यापक वारसा म्हणजे विचार करण्याची प्रेरणा, लोकांशी संवाद साधण्याची पद्धत, मराठी भाषेच्या विकासाला मिळालेली चालना आणि मानवी प्रतिष्ठेला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या मूल्यांची जपणूक. त्यांच्या विचारांचा चिकित्सक अभ्यास केल्यास मध्ययुगीन महाराष्ट्रातील समाजजीवन, धार्मिक परिवर्तन, भाषिक विकास आणि साहित्यनिर्मिती यांचे अनेक पैलू उलगडतात. 'लीळाचरित्र'सारख्या ग्रंथाने मराठी चरित्रलेखनाची वाट खुली केली, तर 'सिद्धांतसूत्रपाठ' आणि 'दृष्टांतपाठ' यांनी तात्त्विक विचारांना ग्रंथरूप दिले. ही परंपरा महाराष्ट्राच्या बौद्धिक इतिहासाचा महत्त्वाचा भाग आहे.म्हणूनच श्रीचक्रधरस्वामी जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या जीवनाकडे केवळ भक्तिभावाने नव्हे, तर इतिहास, समाजशास्त्र, भाषा, साहित्य आणि मानवी मूल्यांच्या व्यापक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजे, भाषा ही जनसामान्यांशी संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम असली पाहिजे आणि धर्म-अध्यात्माच्या चर्चेच्या केंद्रस्थानी माणूस व त्याचे नैतिक जीवन असले पाहिजे, असा व्यापक संदेश त्यांच्या कार्याच्या अभ्यासातून घेता येतो. बदलत्या काळात विचारांची पुनर्मांडणी होत असली तरी मानवतेची गरज कायम असते. त्यामुळे श्रीचक्रधरस्वामींच्या जयंतीचा खरा अर्थ त्यांच्या विचारांचे अंधानुकरण करण्यात नसून त्यांच्या काळातील प्रश्नांमधून आजच्या समाजासाठी उपयुक्त मूल्ये शोधण्यात आहे. समता, अहिंसा, मानवता, लोकभाषेचा सन्मान आणि सर्वांसाठी ज्ञानाची दारे खुली ठेवण्याचा संकल्प केला, तर श्रीचक्रधरस्वामींच्या स्मृतीला तीच खरी आणि अर्थपूर्ण आदरांजली ठरेल.




**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, मराठी व समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

**bagate.rajendra५@gmail.com**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार १३ सप्टेंबर २०२६

# प्रबोधनकार ठाकरे : पेटलेली लेखणी, जागा झालेला समाज

विसाव्या शतकात महाराष्ट्राच्या मातीला वैचारिक आणि सामाजिक प्रबोधनाचा इतिहास आहे महाराष्ट्राला संतांची परंपरा लाभली; पण या मातीत केवळ भक्तीची पालखी निघाली नाही, तर प्रश्नांची मशालही पेटली. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानाची दारे उघडली, संत तुकारामांनी रूढी आणि दांभिकतेवर शब्दांचे आसूड ओढले, महात्मा ज्योतिराव फुले यांनी शूद्र-अतिशूद्रांच्या वेदनेला आवाज दिला, राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाला राजसत्तेची साथ दिली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा संविधानिक मार्ग दाखविला.या प्रदीर्घ प्रबोधनपरंपरेत एक आवाज असा होता की ज्याची भाषा सभ्यतेच्या चौकटीत बसणारी नव्हती; कारण त्याला सभ्यतेच्या नावाखाली चालणारा अन्यायच मान्य नव्हता.तो आवाज होता—केशव सीताराम ठाकरे. महाराष्ट्राने त्यांना नाव दिले होते प्रबोधनकार ठाकरे. काही माणसे लिहितात म्हणून लेखक होतात; काही माणसे लिहितात म्हणून समाज अस्वस्थ होतो.प्रबोधनकार हे दुसऱ्या प्रकारचे लेखक होते.त्यांच्या हातातली लेखणी फुलांच्या पाकळ्यांसारखी मऊ नव्हती तर प्रश्न विचारणारी होती.ती रूढींच्या कपाळावर आठी आणणारी होती. ती धर्माच्या नावाखाली उभ्या केलेल्या भीतीला छेद देणारी होती. जातीय श्रेष्ठत्वाच्या भिंतीवर ती सतत धडकत होती.प्रबोधनकाराला समाज झोपलेला दिसला की ते त्याला अंगाईगीत गात बसले नाहीत. त्यांनी त्याला हलवले.कधी शब्दांनी.कधी उपरोधाने.कधी संतापाने.आणि कधी थेट विद्रोहाने.म्हणूनच ‘प्रबोधनकार’ ही केवळ पदवी नाही; ती त्यांच्या कार्याची ओळख आहे.‘प्रबोधन’ : एका नियतकालिकापेक्षा मोठी चळवळ1921 मध्ये त्यांनी ‘प्रबोधन’ हे पाक्षिक सुरू केले. या नावातच त्यांच्या संपूर्ण जीवनकार्याचा गाभा दडलेला आहे.प्रबोधन म्हणजे फक्त माहिती देणे नव्हे.प्रबोधन म्हणजे माणसाच्या डोक्यात प्रश्न निर्माण करणे.प्रबोधन म्हणजे परंपरेला विचारणे—“हे असेच का?”प्रबोधन म्हणजे देवाच्या नावावर उभ्या केलेल्या व्यवस्थेला प्रश्न विचारणे प्रबोधन म्हणजे जन्माच्या आधारावर एखाद्याला श्रेष्ठ आणि दुसऱ्याला कनिष्ठ ठरविणाऱ्या व्यवस्थेला प्रश्न विचारणे—“माणसाची किंमत जन्माने ठरते की माणूसपणाने?”याच प्रश्नांच्या ज्वालेतून प्रबोधनकारांची पत्रकारिता घडली.त्यांचे लेखन वाचताना असे जाणवते की लेखक आपल्या वाचकासमोर बसून त्याला केवळ माहिती देत नाही; तर त्याच्या खांद्याला धरून म्हणतो—“डोळे उघड! तुझ्या आजूबाजूला जे घडते आहे, त्याकडे नीट पाह.”फुल्यांच्या सत्यशोधक मशालीचा वारसाप्रबोधनकारांच्या विचारविश्वाचा विचार करताना महात्मा ज्योतिराव फुले यांचा संदर्भ टाळता येत नाही.फुले यांनी समाजातील विषमतेला केवळ सामाजिक दोष म्हणून पाहिले नाही. त्यांनी तिच्यामागची सत्ता, धर्माधिकार, ज्ञानावरील मक्तेदारी आणि सामाजिक वर्चस्व यांचा शोध घेतला.‘गुलामगिरी’ या ग्रंथातून फुले यांनी शोषणाच्या व्यवस्थेला प्रश्न विचारला.‘शेतकऱ्याचा असूड’ मधून त्यांनी शेतकऱ्याच्या वेदनेला शब्द दिले.‘सार्वजनिक सत्यधर्म’ मधून त्यांनी मानवी समतेवर आधारित धर्माची कल्पना मांडली.प्रबोधनकारांच्या लेखणीतही हीच प्रश्न विचारण्याची परंपरा आक्रमक रूपात पुढे येताना दिसते.फुल्यांनी समाजाच्या जखमेवर बोट ठेवले.प्रबोधनकारांनी त्या जखमेवरची पट्टी काढून “ही जखम झाली कशी?” असा प्रश्न विचारला.हीच सत्यशोधक परंपरेची ताकद होती.जात : माणसाच्या कपाळावरचा शिक्काभारतीय समाजाच्या इतिहासात जात हा केवळ सामाजिक परिचय राहिला नाही; तो माणसाच्या संधींचा, प्रतिष्ठेचा आणि अधिकारांचा निर्धार करणारा घटक बनला.कोण कुठे जन्माला आले त्याला ज्ञानाचा अधिकार.कोण कुठे जन्माला आले आणि त्याला श्रमाचा अधिकार.कोण कुठे जन्माला आले आणि त्याला मंदिराच्या दारापर्यंत जाण्याचीही मनाई.कोण कुठे जन्माला आले आणि त्याच्या सावलीलाही अपवित्र ठरवले गेले.या व्यवस्थेवर प्रबोधनकारांनी प्रश्न उपस्थित केला.त्यांच्या सामाजिक विचाराचा केंद्रबिंदू असा होता की माणसाला जन्माच्या आधारे श्रेष्ठ-कनिष्ठ ठरविणे ही सामाजिक अन्यायाची रचना आहे.ही भूमिका आजही संपलेली नाही.जात बदलली असेल; तिचे रूप बदलले असेल; भाषेचा पोशाख बदलला असेल; पण जातीय अहंकार अजूनही जिवंत आहे.कधी लग्नाच्या वेळी तो दिसतो.कधी राजकारणात.कधी गावाच्या पाणवठ्यावर.कधी शिक्षणाच्या संधींमध्ये.कधी सोशल मीडियाच्या भाषेत.म्हणूनच प्रबोधनकारांना आज पुन्हा वाचण्याची गरज आहे.धर्माच्या नावावर प्रश्न प्रबोधनकार धर्माला प्रश्न विचारतात तेव्हा त्यांच्या प्रश्नामागे माणूस उभा असतो.त्यांना धर्माने माणसाला नैतिक बनवावे असे वाटते; भयभीत नव्हे.धर्माने माणसाला जोडावे; तोडू नये.धर्माने करुणा शिकवावी; द्वेष नव्हे.धर्माने विवेक जागवावा; अंधानुकरण नव्हे.धर्माच्या नावावर जर माणसाचे शोषण होत असेल, तर त्या शोषणाला प्रश्न विचारणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे, असा त्यांच्या विचाराचा आशय आहे.ही भूमिका समजून घेताना त्यांना केवळ ‘धर्मविरोधी’ या एका शब्दात बंदिस्त करणे अन्यायकारक ठरेल.त्यांचा प्रश्न धर्माच्या अस्तित्वाला नसून धर्माच्या नावावर निर्माण झालेल्या वर्चस्वाला होता.‘भिक्षुकशाहीचे बंड’ : शब्दांचा सामाजिक आक्रोशप्रबोधनकारांच्या लेखनातील ‘भिक्षुकशाहीचे बंड’ ही संकल्पना त्यांच्या सामाजिक विद्रोहाचे प्रतिनिधित्व करते.येथे ‘भिक्षुकशाही’ ही केवळ एखाद्या व्यक्तीची किंवा समूहाची टीका नसून धार्मिक अधिकाराचा आधार घेऊन निर्माण होणाऱ्या सामाजिक वर्चस्वाची चिकित्सा म्हणून समजणे आवश्यक आहे.प्रबोधनकारांचा प्रश्न होता—ज्ञानावर कोणाची मक्तेदारी?धर्म सांगण्याचा अधिकार कोणाचा?विधी करण्याचा अधिकार कोणाचा?आणि या अधिकारातून सामाजिक प्रतिष्ठा कोणाला मिळते?या प्रश्नांनी त्यांच्या लेखणीला धार दिली.साहित्य : समाजाच्या जखमेचे आरसेप्रबोधनकारांचे साहित्य हे केवळ मनोरंजनासाठी नाही.त्यांच्या लेखनात समाजाचे रक्त दिसते.‘खरा ब्राह्मण’, ‘कुमारिकांचे शाप’, ‘टाकलेले पोर’, ‘भिक्षुकशाहीचे बंड’, ‘माझी जीवनगाथा’ यांसारख्या लेखनातून त्यांच्या सामाजिक चिंतनाची विविध रूपे समोर येतात.त्यांच्या साहित्याकडे पाहताना एक गोष्ट जाणवते—त्यांना साहित्य हे समाजापासून पळून जाण्याचे साधन वाटत नव्हते; उलट समाजाच्या मध्यभागी उभे राहून त्याला आरसा दाखविण्याचे साधन वाटत होते.म्हणूनच त्यांचे लेखन कधी निबंध वाटते, कधी सामाजिक दस्तऐवज, कधी उपरोध, तर कधी विद्रोह.‘माझी जीवनगाथा’ : एका व्यक्तीच्या जीवनापलीकडचा काळप्रबोधनकारांचे ‘माझी जीवनगाथा’ हे आत्मचरित्र केवळ स्वतःची कहाणी सांगणारे पुस्तक नाही.ते एका काळाचे सामाजिक स्मरण आहे.एका पिढीने पाहिलेला महाराष्ट्र त्यात दिसतो.रूढींच्या सावल्या दिसतात.सामाजिक संघर्ष दिसतो.विचारांची धडपड दिसते.आणि एका माणसाची स्वतःशीच सुरू असलेली वैचारिक झुंजही दिसते.आत्मचरित्राचे मोठेपण याच ठिकाणी असते—लेखक स्वतःची कथा सांगताना आपल्या काळाची कथा सांगतो.‘माझी जीवनगाथा’ याच अर्थाने महत्त्वाची ठरते.संतपरंपरा आणि प्रबोधनपरंपरामहाराष्ट्रातील प्रबोधन समजून घेताना संतपरंपरा विसरता येत नाही.संत तुकारामांच्या अभंगात दांभिकतेवर केलेला उपरोध आठवतो—“बुडती हे जन न देखवे डोळा”हा केवळ भक्ताचा आक्रोश नाही; तो समाजाच्या अधःपतनाबद्दलचा नैतिक अस्वस्थपणा आहे.ज्ञानेश्वरांनी ज्ञानाचे दार उघडले.तुकारामांनी ढोंगीपणाला प्रश्न विचारला.फुल्यांनी सामाजिक गुलामगिरीचा शोध घेतला.शाहूंनी सामाजिक न्यायाला राजकीय पाठबळ दिले.बाबासाहेब आंबेडकरांनी त्या संघर्षाला संविधानिक दिशा दिली.आणि या सर्व प्रवाहांमध्ये प्रबोधनकारांची लेखणी सामाजिक रूढींवर प्रहार करणाऱ्या शब्दशक्तीचे रूप घेऊन उभी राहते. शाहू महाराज आणि सामाजिक न्यायराजर्षी शाहू महाराजांचे कार्य हे सामाजिक समतेच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे पर्व आहे.शिक्षण, आरक्षण, अस्पृश्यता निवारण आणि सामाजिक न्याय यांसाठी त्यांनी प्रत्यक्ष राज्यसत्ता वापरली.प्रबोधनकारांच्या विचारविश्वातही बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीचा प्रश्न महत्त्वाचा होता.इथे फुले—शाहू—आंबेडकर आणि प्रबोधनकार ही एक वैचारिक सलगता दिसते.फुल्यांनी प्रश्न विचारला.शाहूंनी धोरणे राबवली.प्रबोधनकारांनी समाजाच्या मनावर प्रहार केला.आणि पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक न्यायाला कायदा आणि संविधानाचा आधार दिला.बाबासाहेब आंबेडकर आणि प्रबोधनकारडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा संदर्भ घेतल्याशिवाय महाराष्ट्रातील आधुनिक सामाजिक प्रबोधनाचा इतिहास अपूर्ण राहतो.आंबेडकरांनी स्पष्टपणे सांगितले की सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाही टिकू शकत नाही.स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही त्यांची त्रिसूत्री होती.प्रबोधनकारांच्या लेखणीतून व्यक्त होणारा जातिभेदविरोध, सामाजिक समतेचा आग्रह आणि रूढींची चिकित्सा हे विचार बाबासाहेबांच्या व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या प्रकल्पाशी संवाद साधताना दिसतात.दोघांची साधने वेगवेगळी होती.पण प्रश्न एकच—माणूस माणसाच्या बरोबरीने कधी उभा राहणार?स्त्री : घराच्या चौकटीबाहेरचे आकाशसमाजसुधारकाचे मोठेपण त्याच्या स्त्रीविषयक भूमिकेतही दिसते.हुंडा, बालविवाह आणि स्त्रीला दुय्यम ठरविणाऱ्या सामाजिक रूढींवर प्रबोधनकारांनी प्रश्न उपस्थित केले.स्त्रीचे आयुष्य केवळ विवाह, संसार आणि कुटुंबाच्या चौकटीत बंदिस्त असू नये, ही आधुनिक सामाजिक जाणीव त्यांच्या कार्यात दिसते.आज स्त्री अंतराळात जाते.विज्ञानात नेतृत्व करते.प्रशासन चालवते.राजकारणात उतरते.व्यवसाय उभा करते.तरीही तिच्यावरच्या सामाजिक नियंत्रणाची अनेक रूपे कायम आहेत.म्हणून प्रबोधनकारांचा स्त्रीविषयक विचार आजही संपलेला नाही.शिक्षण : अक्षरांपासून विवेकापर्यंतप्रबोधनकारांच्या विचारविश्वात शिक्षणाला महत्त्वाचे स्थान आहे.पण शिक्षण म्हणजे केवळ पदवी नव्हे.पदवी घेतलेला माणूसही अंधश्रद्धाळू असू शकतो.उच्चशिक्षित माणूसही जातीय असू शकतो.मोठ्या पदावर असलेला माणूसही स्त्रीला दुय्यम मानू शकतो.म्हणून खरे शिक्षण म्हणजे विचार करण्याची क्षमता.प्रश्न विचारण्याची हिंमत.पुरावा तपासण्याची सवय.आणि चुकीचे दिसले तर स्वतःच्या परंपरेलाही प्रश्न विचारण्याचे धैर्य.याच अर्थाने प्रबोधनकारांचे शिक्षणविषयक विचार आजच्या विद्यापीठासाठीही महत्त्वाचे आहेत.आजचा मोबाईल आणि प्रबोधनकारांची लेखणीप्रबोधनकारांच्या हातात ‘प्रबोधन’ होते.आज आपल्या हातात स्मार्टफोन आहे.त्यांच्या काळात एखादा विचार छापून समाजापर्यंत पोहोचण्यासाठी दिवस लागायचे.आज एक खोटी माहिती काही सेकंदांत लाखो लोकांपर्यंत पोहोचते.त्यांच्या काळात अंधश्रद्धेला गावच्या चौकात व्यासपीठ मिळायचे.आज तिला सोशल मीडियावर लाखो प्रेक्षक मिळतात.त्यामुळे आजच्या काळातील प्रबोधनाची भाषा बदलली पाहिजे.आज प्रश्न असा नाही की ‘प्रबोधनकारांचे लेखन वाचायचे का?’प्रश्न असा आहे—त्यांच्या प्रश्न विचारण्याच्या वृत्तीला आपण आपल्या काळात कसे जिवंत ठेवणार?आज प्रत्येक शिक्षक, लेखक, पत्रकार, विद्यार्थी आणि नागरिक हा छोटा-मोठा प्रबोधनकार होऊ शकतो.प्रबोधन विरुद्ध अंधानुकरणअंधानुकरणाला प्रश्न आवडत नाही.प्रबोधन प्रश्नांपासून सुरू होते.अंधश्रद्धेला पुरावा नको असतो.विवेकवाद पुरावा मागतो.जातिव्यवस्थेला जन्म महत्त्वाचा वाटतो.समतेला माणूस महत्त्वाचा वाटतो.दांभिकतेला बाह्य आचार महत्त्वाचा वाटतो.मानवतावादाला माणसाचे आचरण महत्त्वाचे वाटते.याच संघर्षाच्या एका बाजूला प्रबोधनकार उभे दिसतात.आज प्रबोधनकार का वाचावेत?आज आपण आधुनिक झालो आहोत, असे आपण म्हणतो.पण आधुनिकता म्हणजे मोबाईल, इंटरनेट, मॉल आणि कार एवढीच नाही.आधुनिकता म्हणजे विचार करण्याची पद्धत.जात विचारण्याआधी माणूस पाहणे.धर्म विचारण्याआधी मानवता पाहणे.अफवा ऐकण्याआधी पुरावा तपासणे.परंपरा स्वीकारण्याआधी तिचे सामाजिक परिणाम तपासणे.महापुरुषांचे नाव घेण्याआधी त्यांच्या विचारांप्रमाणे आचरण करणे.ही आधुनिकता आहे.आणि म्हणूनच प्रबोधनकार आजही आवश्यक आहेत.महापुरुषांची नावे आणि विचारांची चोरीआज एक विचित्र प्रवृत्ती दिसते.महापुरुषांची नावे मोठमोठ्याने घेतली जातात.त्यांचे फोटो लावले जातात.जयंती साजरी केली जाते.मिरवणुका निघतात.पण त्यांच्या विचारांचा स्वीकार किती?फुल्यांचे नाव घेणारा जातिव्यवस्थेला विरोध करतो का?शाहूंचे नाव घेणारा सामाजिक न्याय स्वीकारतो का?आंबेडकरांचे नाव घेणारा संविधानिक मूल्यांशी प्रामाणिक राहतो का?प्रबोधनकारांचे नाव घेणारा अंधश्रद्धेला प्रश्न विचारतो का?हा प्रश्न अस्वस्थ करणारा आहे.पण प्रबोधनकारांची खरी आठवण म्हणजे अस्वस्थ करणारे प्रश्न जिवंत ठेवणे.प्रबोधनकारांची खरी परंपराप्रबोधनकारांची परंपरा म्हणजे एखाद्या व्यक्तीची पूजा नव्हे.ती विचारांची परंपरा आहे.ती प्रश्नांची परंपरा आहे.ती विद्रोहाची परंपरा आहे.ती सामाजिक समतेची परंपरा आहे.ती विवेकाची परंपरा आहे.ती माणसाला माणूस म्हणून पाहण्याची परंपरा आहे.त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली द्यायची असेल तर त्यांच्या नावाने कार्यक्रम करण्यापेक्षा त्यांच्या विचाराने एखादा प्रश्न विचारला पाहिजे.एखाद्या अंधश्रद्धेला विरोध केला पाहिजे.एखाद्या जातीय भेदभावाविरुद्ध उभे राहिले पाहिजे.एखाद्या गरीब विद्यार्थ्याला शिक्षणाची संधी दिली पाहिजे.एखाद्या स्त्रीला समानतेचा अधिकार दिला पाहिजे.कारण प्रबोधन भाषणात नसते; ते आचरणात असते.उपसंहार : अजूनही एक मशाल पेटलेली आहे...काळ बदलला.माणसांच्या हातातील साधने बदलली.गाव बदलले.शहरे बदलली.माहितीच्या जगाचा वेग बदलला.पण माणसाच्या मनातले काही अंधार अजूनही तसेच आहेत.जात अजूनही कुठेतरी जिवंत आहे.अंधश्रद्धा अजूनही कुठेतरी डोके वर काढते.धर्माच्या नावावर द्वेष अजूनही पसरतो.स्त्रीला अजूनही प्रश्न विचारले जातात.गरीबाला अजूनही संधीसाठी संघर्ष करावा लागतो.आणि म्हणूनच प्रबोधनकारांची लेखणी अजूनही आपल्याला हाक देते.ती म्हणते—“डोळे उघडा.”“प्रश्न विचारा.”“विचार करा.”“माणसाला माणूस म्हणून ओळखा.”महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात प्रबोधनकारांचे मोठेपण याच ठिकाणी आहे.त्यांनी समाजाला केवळ ज्ञान दिले नाही;त्यांनी समाजाला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी दिली.त्यांनी केवळ रूढींवर टीका केली नाही;त्यांनी रूढींच्या मुळाशी जाण्याचे धैर्य दिले.त्यांनी केवळ अंधश्रद्धेला विरोध केला नाही;त्यांनी विवेकाची मशाल हातात दिली.आणि म्हणूनच प्रबोधनकार ठाकरे हे इतिहासातील एक पान नाहीत.ते एक प्रश्न आहेत.तो प्रश्न आजही आपल्या समोर उभा आहे—“तुम्ही परंपरेचे गुलाम राहणार आहात की विवेकाचे नागरिक होणार आहात?”या प्रश्नाचे उत्तर प्रत्येक पिढीला स्वतःच्या कृतीतून द्यावे लागेल.आणि त्या उत्तराच्या शोधात प्रबोधनकारांची पेटलेली लेखणी आजही आपल्या हातात मशाल देत उभी आहे.

**डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार**

**मो. +९१ ७७४१८ ०७०६८**